# महावितरण विद्युत वार्ता

■ वर्ष : १८ ■ अंक : २१ ■ फेब्रुवारी २०२५ ■ पाने : ८

# ग्राहकांच्या सेवेत महावितरणची ऐतिहासिक कामगिरी

## हितगुज



**लोकेश चंद्र**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांच्या नेतृत्वात महावितरणने वीज ग्राहकांच्या सेवेच्या बाबतीत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. महावितरणने आगामी पाच वर्षांसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सादर केलेल्या याचिकेमध्ये वीजदर कमी करण्याची परवानगी मागितली आहे. घरगुती व औद्योगिक ग्राहकांच्या वीजदरात आगामी पाच वर्षात टप्प्या टप्प्याने कपात, औद्योगिक ग्राहकांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा प्रथमच कमी करणे आणि घरगुती वीज ग्राहकांना दिवसाच्या वीज वापराबद्दल वीजदरात अतिरिक्त टीओडी सवलत देणे ही या याचिकेची वैशिष्ट्ये आहेत.

मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने गेल्या अडीच वर्षात रिन्युएबल एनर्जीच्या वापरावर भर दिला व त्याच वेळी महावितरणच्या पायाभूत सुविधांच्या सुधारणांसाठी भरीव कामगिरी केली. रिन्युएबल एनर्जीवर भर दिल्यामुळे आगामी पाच वर्षात महावितरणचे वीज खरेदीचे सुमारे ६६ हजार कोटी रुपये वाचणार आहेत. त्यामुळेच महावितरण वीजदर कमी करण्याचा प्रस्ताव मांडू शकली आहे. मा. आयोगाने मंजुरी दिल्यानुसार दि. १ एप्रिलपासून नवे दर लागू होतील.

शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा आणि भरवशाचा वीज पुरवठा करण्यासाठीची मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एप्रिल २०२३ मध्ये सुरू झाली. त्यानंतर महावितरण, राज्याचा ऊर्जा विभाग आणि महसूल विभाग यांनी समन्वयाने प्रभावी कामगिरी केली. सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी जमीन उपलब्ध करणे, या ऊर्जेचा वापर करता यावा यासाठी विद्युत वितरण जाळे बळकट करणे, सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणाऱ्या खासगी कंपन्यांसोबत वीजखरेदी करार करण्यासोबत सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करणे अशी सर्व कामे युद्ध पातळीवर करण्यात आली. अल्पावधीत १५,४८७ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीचे कार्यादेश देण्यात आले. हे प्रकल्प उभारणीचे काम अत्यंत गतीने चालू आहे. मार्च २०२६ अखेर सर्व प्रकल्प चालू झालेले असतील आणि राज्यातील कृषी पंपांना संपूर्ण १६ हजार मेगावॅट वीज सौरऊर्जेद्वारे देण्याचे स्वप्न पूर्ण होईल. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा आणि भरवशाचा वीज पुरवठा होईल. या योजनेमुळे सरासरी प्रती युनिट ३ रुपये ८ पैसे अशा माफक दरात वीज मिळणार आहे. या योजनेमुळे वीज खरेदी खर्चात बचत होणार आहे हे आगामी पाच वर्षात ग्राहकांचे वीज दर कमी करण्याच्या प्रस्तावाचे महत्त्वाचे कारण आहे.

### रिन्युएबल एनर्जीमुळे ग्राहकांना लाभ

सध्या राज्याची विजेची मागणी २९ हजार मेगावॅटच्या घरात आहे. आगामी पाच वर्षात ती ४५ हजार मेगावॅट अर्थात ४५ गिगावॅटवर पोहोचणार आहे. विजेच्या मागणीच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य इंग्लंड, स्पेन, इटली आदी देशांच्याही पुढे जाईल. त्या दृष्टीने आगामी पाच वर्षांसाठी महावितरणने ४५ गिगावॅट वीजखरेदीचे करार केले आहेत. त्यामध्ये ३८ गिगावॅट रिन्युएबल एनर्जीचा समावेश आहे. ही वीज स्वस्तात मिळणार असल्याने ऊर्जेचा वापर वाढला तरी वीजखरेदीचा खर्च कमी होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत दूरदृष्टीने आणि काळाची पावले ओळखून रिन्युएबल एनर्जीवर भर दिला त्याचा लाभ वीज ग्राहकांना होत आहे.

शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सवलतीने वीज पुरविली जाते. त्यासाठी राज्य सरकारकडून अनुदान आणि उद्योगांच्या वीजदरात वाढ करून क्रॉस सबसिडी अशी भरपाई केली जाते. क्रॉस सबसिडीचा बोजा हटवावा, अशी उद्योगांची अनेक दशकांची मागणी आहे. महावितरणच्या यावेळच्या याचिकेत उद्योगांवरील क्रॉस सबसिडी हटविण्याचे स्वप्न साकारले आहे. आगामी आर्थिक वर्ष २०२५ – २६ पासून म्हणजेच १ एप्रिलपासून उद्योगांना सरासरी वीज पुरवठा दरानुसार दर आकारण्याचा महावितरणचा प्रस्ताव आहे. त्यामुळे प्रथमच उद्योगांना क्रॉस सबसिडी द्यावी लागणार नाही. त्यासोबत आगामी पाच वर्षात उद्योगांच्या वीजदरात टप्प्या टप्प्याने कपात करण्यात येईल.

### घरगुती वीज ग्राहकांना दिलासा

महिना ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण एकूण घरगुती ग्राहकांमध्ये सुमारे ९८ टक्के आहे व त्यांना महावितरणच्या याचिकेमध्ये दिलासा देण्यात आला आहे. घरगुती वीज ग्राहकांमध्ये महिना १०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांचे ७५ टक्के प्रमाण आहे. या ग्राहकांना सध्या असलेला प्रती युनिट ८ रुपये १४ पैसे हा दर २०२५ –२६ या आगामी आर्थिक वर्षात ७ रुपये ६५ पैसे इतका कमी करण्यात येईल. पुढे हा दर आणखी कमी करण्यात येईल. पाच वर्षांच्या कालावधीत या ग्राहकांसाठीचा विजेचा दर ५ रुपये ८७ पैसे प्रती युनिट या पातळीवर कमी झालेला असेल.

दरमहा १०० ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांचे प्रमाण २२.४ टक्के इतके आहे. या ग्राहकांसाठीचा सध्याचा प्रती युनिट वीजदर १३ रुपये २४ पैसे इतका आहे. आगामी आर्थिक वर्षात तो थोडा वाढविण्याचा प्रस्ताव असला तरी नंतरच्या वर्षांमध्ये हा दर घसरत जाऊन पाचव्या वर्षी ११ रुपये ८२ पैसे होईल.

घरगुती वीज ग्राहकांना महावितरणने आणखी एक मोठी भेट प्रस्तावित केली आहे. आयोगाकडे सादर केलेल्या प्रस्तावानुसार घरगुती ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेतील वीज वापरासाठीच्या दरात सवलत देण्यात येईल. आर्थिक वर्ष २०२५ –२६ मध्ये प्रती युनिट ८० पैसे, २०२६ – २७ मध्ये ८५ पैसे, २०२७ –२८ मध्ये ९० पैसे, २०२८ –२९ मध्ये ९५ पैसे आणि २०२९ –३० या वर्षात १ रुपया सवलत देण्यात येईल. आयोगाने मान्यता दिल्यानंतर दि. १ एप्रिलपासून ही सवलत सुरू होऊ शकते.

घरगुती वीज वापरात मिक्सर, इस्त्री, वॉशिंग मशिन, ओव्हन इत्यादींना मोठ्या प्रमाणात वीज लागते. या उपकरणांचा वापर सकाळी ९ ते

(उर्वरित मजकूर पान क्र. २ वर)

# पाच उपकेंद्रांना एकाच वेळी ‘आयएसओ’चा बहुमान



सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता, मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्या हस्ते आयएसओ प्रमाणपत्र स्वीकारताना कार्यकारी अभियंता महेश पाटील, सहायक अभियंता सतीश अधाने व सहकारी, समवेत मान्यवर.

**छत्रपती संभाजीनगर** परिमंडलाच्या शहर मंडलातील ३३ केव्ही एसटीपीआय (चिकलठाणा एमआयडीसी) व बेडसे तर ग्रामीण मंडलातील गांधेली, शेंद्रा व हिवरा या पाच उपकेंद्रांना एकाच वेळी ‘आयएसओ ९००१:२०१५’ मानांकनाचा बहुमान मिळाला आहे. प्रजासत्ताक दिनाचे निमित्ताने सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता यांच्या हस्ते उपकेंद्रांचे अभियंता व यंत्रचालकांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

याप्रसंगी मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, महापारेषणचे माजी संचालक उत्तम झाल्टे, ‘एमआयटीएल’चे महाव्यवस्थापक शंकर शिंदे, मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अ‍ॅन्ड अ‍ॅग्रिकल्चरचे अध्यक्ष चेतन राऊत, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, संदीप दरवडे, ‘आयएसओ’चे प्रधान लेखापरीक्षक एन.डी. देशमुख यांची उपस्थिती होती. याकरिता कार्यकारी अभियंता महेश पाटील, शैलेश कलंत्री, अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रशांत नाखले, विश्वनाथ लहाने, उपकार्यकारी अभियंता भाऊसाहेब साळुंके, सहायक अभियंता सतीश अधाने, भालचंद्र जाधव, मनीष मगर, योगेश चेंडके, यंत्रचालक व जनमित्रांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यंत्रचालक रमेश शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन उल्हास देशपांडे यांनी केले.

# चिचघाट-राठी विदर्भातील पहिले ‘सौरग्राम’

**प्रधानमंत्री** सूर्यघर मोफत वीज योजनेच्या माध्यमातून विदर्भातील पहिले शंभर टक्के ‘सौरग्राम’ होण्याचा मान वर्धा जिल्ह्याच्या हिंगणघाट तालुक्यातील चिचघाट-राठी या गावाने मिळवला आहे. या गावात ७० घरगुती , ४ औद्योगिक, १ व्यावसायिक, अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा, पथदिवे व सार्वजनिक पाणीपुरवठा अशा एकूण ७९ वीजजोडण्या आहेत. सर्व ग्राहक सौरप्रकल्पाद्वारे निर्मित ऊर्जेचा वापर करत आहेत.

चिचघाट-राठी सौरग्रामसाठी कार्यकारी अभियंता हेमंत पावडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता पंकज फाळे, उपकार्यकारी अभियंता प्रशांत तेलतुमडे, प्रवीण तुरणकर, सहायक अभियंता अंकुश चहांदे, श्रीनिधी धुर्वे, निशिगंधा डवरे, उपव्यवस्थापक (विवले) विलास चतारे, सहायक लेखापाल मयुर बिनोने, वरिष्ठ तंत्रज्ञ राजेंद्र उगे यांनी परिश्रम घेतले. गावच्या सरपंच सीमा बेवडे, माजी सरपंच राजेश कोचर, उद्योगपती वरूण राठी, रितेश सुराणा, बॅक ऑफ बडोदाचे चेतन वंजारी, विनित विवेक यांनी विशेष प्रयत्न केले.



सौरग्राम चिचघाट-राठी

# कोथरूडमधील भाग्यश्री अपार्टमेंट सौर ऊर्जेवर; मासिक वीजबिल शून्यावर !

**सर्व घरगुती** व सामाईक वीजजोडण्यांसाठी ३० किलोवॅट क्षमतेचे छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून कोथरूडमधील भाग्यश्री अपार्टमेंटने सौर अपार्टमेंटचा मान मिळविला आहे. या अपार्टमेंटमधील सर्व वीजग्राहकांचे मासिक बिल शून्यावर आले असून त्यांना दरमहा ३५ हजार रुपयांचा फायदा होत आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून या ग्राहकांना सौर प्रकल्पासाठी ५ लाख ५४ हजार रुपयांचे अनुदान मिळाले आहे. मा. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते भाग्यश्री अपार्टमेंटचे रहिवासी आनंद देशपांडे, मंदार देशमुख, सतीश आठवले यांचा नुकताच प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला. या सौर अपार्टमेंटसाठी अतिरिक्त कार्यकारी अभियंता राजेश काळे, शाखा अभियंता आशुतोष थोरात, जनमित्र कैलास मडावी, कार्यालयीन सहायक विजय त्रिंबके यांनी पाठपुरावा केला.

(हितगूज : पान क्र. १ वरुन )

सायंकाळी ५ या वेळेत करण्याचे नियोजन केले तर घरगुती ग्राहकांना टीओडी सवलतीचा प्रभावी वापर करता येईल. तसेच उन्हाळ्यात दिवसा पंखे, कूलर आणि एसी यांचा वापर वाढतो. त्यावेळीही ग्राहकांना टीओडी सवलतीचा अधिक उपयोग होईल.

टीओडी सुविधा मिळण्यासाठी वीज ग्राहकाने कोणत्या वेळेला विजेचा वापर केला हे समजणे आवश्यक आहे. घरगुती ग्राहकांकडे सध्या बसविलेल्या मीटरमध्ये टीओडीची सुविधा नाही. तथापि, घरगुती ग्राहकांना टीओडी सवलतीचा लाभ घेता यावा यासाठी महावितरणकडून त्यांना मोफत टीओडी मीटर बसवून देण्यात येणार आहेत.

महावितरणने वीज ग्राहकांच्या सेवेसाठी पुढचे पाऊल टाकले आहे. त्यांना टीओडी मीटरच्या लाभासह आयोगासमोर सादर केलेल्या याचिकेची वैशिष्ट्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समजून सांगणे अपेक्षित आहे.

## पुण्यात सौररथाचे उद्घाटन



▸▸ प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या सौररथाचे उद्घाटन मा. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते झाले.

**प्रधानमंत्री** सूर्यघर वीज योजनेचा जागर करण्यासाठी सौररथाचे पुणे येथे मा.केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमासाठी महावितरणचे त्यांनी कौतुक केले. घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्यवत करणाऱ्या या योजनेत जास्तीत जास्त वीजग्राहकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

पुण्यातील पांडवनगरात आयोजित सौररथ उद्घाटन कार्यक्रमास आमदार सिद्धार्थ शिरोळे, मुख्य अभियंता राजेंद्र पवार, अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड, मास्माचे अध्यक्ष शशिकांत वाकडे, समीर गांधी यांची उपस्थिती होती. या योजनेचा जागर करण्यासाठी महावितरण व महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चरर्स असोशिएशन (मास्मा) यांच्या सहकार्याने पुणे व पिंपरी चिंचवड शहरात विविध ठिकाणी पाच दिवस सौररथ फिरविण्यात आला. डिजिटल स्क्रिनद्वारे योजनेचा जागर करण्यात आला.

## अंजनगाव उपकेंद्राचे उद्घाटन



▸▸ ३३/११ केव्ही अंजनगाव विद्युत उपकेंद्राचे उद्घाटनप्रसंगी मा. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उपकेंद्राची पाहणी केली.

**बारामती** तालुक्यातील अंजनगाव (कऱ्हावागज) ३३/११ केव्ही नवीन विद्युत उपकेंद्राचे मा. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या उपकेंद्रामुळे अंजनगाव परिसरातील सुमारे तीन हजार ग्राहकांना योग्य दाबाने व सुरळीत वीजपुरवठा मिळणार आहे.

कृषी आकस्मिक निधीतून मंजूर झालेल्या या नवीन उपकेंद्रामध्ये ५ एमव्हीए क्षमतेची २ रोहित्रे बसविण्यात आली आहेत. या उपकेंद्रामुळे अंजनगाव, रानमळा, कुचेकरवस्ती, कऱ्हावागज शिवार, बनकरवस्ती, नेपतवळण, तांदळेवस्ती, नाळेवस्ती, खोमणेवस्ती, लष्करवस्ती या भागातील ग्राहकांना लाभ होणार आहे. उपकेंद्राच्या उद्घाटन प्रसंगी खा. सुप्रिया सुळे, अंजनगावच्या सरपंच प्रतिभा परकाळे, मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, अधीक्षक अभियंता दीपक लहामगे, कार्यकारी अभियंते संजय सोनवलकर, म्हसू मिसाळ व प्रमोद रागीट यांची उपस्थिती होती.

# ग्राहकसेवेच्या दर्जात सुधारणा करून वीजबिल वसुलीस प्राधान्य द्या

## संचालक (संचालन तथा मानव संसाधन) अरविंद भादिकर यांचे निर्देश

**वीजग्राहकांना** सर्वोत्कृष्ट सेवा देऊन वीजबिलांची १०० टक्के वसुली करावी. तसेच वितरण हानी कमी करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करून विविध ग्राहकाभिमुख योजनांची कामे वेगाने करा, असे निर्देश संचालक (संचालन तथा मानव संसाधन) अरविंद भादिकर यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर परिमंडलात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, संदीप दरवडे, संजय सरग, बीना सावंत, शुभांगी कटकधोंड, वरिष्ठ व्यवस्थापक लक्ष्मीकांत राजेल्ली यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मंडलनिहाय आढावा घेताना भादिकर म्हणाले की, वितरण हानी कमी करण्यासाठी निश्चित केलेल्या कृती आराखड्यानुसार काम होणे आवश्यक आहे. ग्राहकांना वापरानुसार अचूक वीजबिल, ग्राहकांचे नादुरुस्त मीटर बदलणे, वीजचोरीला आळा घालण्यासाठी नियमित ग्राहक मीटर तपासणी मोहीम, वीजचोरी असलेल्या भागात पॉली केबलचा वापर, ग्राहकांना विनाविलंब वीजजोडणी, ग्राहकांच्या विविध तक्रारींचा तातडीने निपटारा यांना प्राधान्य द्या. नियामक आयोगाने निर्धारित केलेल्या कालावधीत ग्राहकांना सेवा न दिल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.



▸▸ आढावा बैठकप्रसंगी संचालक (संचालन तथा मानव संसाधन) अरविंद भादिकर समवेत मुख्य अभियंता पवनकुमार कछोट.

वीजबिल वसुलीसाठी व्यापक प्रयत्न करा. थकबाकीदारांचा वीजपुरवठा तातडीने खंडित करा. तसेच कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित ग्राहकांसाठी कंपनीने अभय योजना जाहीर केलेली असून त्यामध्ये संपूर्ण व्याज व विलंब आकार माफ आहे. तेंव्हा सर्व थकबाकीदार ग्राहकांची प्राधान्याने तपासणी करणे, अनधिकृत वीजपुरवठा आढळल्यास त्यांच्यावर गुन्हे नोंदवणे, जर अन्य ग्राहकाच्या नावाने त्या जागेवर नवीन जोडणी दिलेली आढळल्यास जुनी थकबाकी त्या नवीन ग्राहकांकडे वळती करावी. तसेच पथके तयार करून वीजचोरी पकडण्याची मोहीम आखण्याचे निर्देश त्यांनी दिले.

# अचूक बिलिंगसाठी सदोष, नादुरुस्त मीटर तातडीने बदला

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचे निर्देश



▸▸ पुणे प्रादेशिक विभागाच्या आढावा बैठक प्रसंगी
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र.
पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे,
मुख्य अभियंते राजेंद्र पवार, स्वप्निल काटकर, धर्मराज पेठकर

**ग्राहकसेवेच्या** कृती मानकांनुसार निश्चित केलेल्या कालावधीत मागेल त्यांना नवीन वीजजोडणी त्वरीत देण्यात यावी. अचूक बिलिंगसाठी नादुरुस्त व सदोष वीजमीटर तातडीने बदलण्यात यावेत, असे निर्देश अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिले.

पुणे येथील प्रकाशभवनात आयोजित पुणे प्रादेशिक विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंता राजेंद्र पवार (पुणे), स्वप्निल काटकर (कोल्हापूर), धर्मराज पेठकर (बारामती), प्रभारी महाव्यवस्थापक (वित्त) माधुरी राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र म्हणाले की, वीजग्राहकांनी वापरलेल्या प्रत्येक युनिटचे बिलिंग होणे आवश्यक आहे. मात्र नादुरुस्त किंवा सदोष वीजमीटरमुळे महावितरण व ग्राहकांना आर्थिक फटका बसतो. वीजग्राहकांना मासिक वीजवापर देखील अचूक कळत नाही. नवीन वीजमीटर मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे नादुरुस्त, सदोष वीजमीटर तातडीने बदलण्यात यावेत, अशी सूचना यावेळी त्यांनी केली.

थकबाकीदार ग्राहकांवर लक्ष केंद्रीत करून थकबाकी व चालू वीजबिल वसूलीवर भर द्यावा. प्रामुख्याने उच्चदाब वर्गवारीमध्ये ग्राहकांकडे थकबाकी वाढणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्यांची थकबाकी अनामत रकमेएवढी झाल्यास वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित करण्याची कार्यवाही करावी, असे लोकेश चंद्र यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, राज्याच्या वीजक्षेत्रात महावितरणची आश्वासक वाटचाल सुरु आहे. ऐन हिवाळ्यात दि. ११ जानेवारी रोजी २५ हजार ८०८ मेगावॅट विजेची विक्रमी मागणी होती. ती पूर्वनियोजनामुळे अतिरिक्त वीज खरेदी न करता पूर्ण करण्यात आली. अन्य राज्यांच्या तुलनेत महावितरणकडून सर्वाधिक मागेल त्यांना सौर कृषिपंप देण्यात आले आहेत. तसेच मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार आहे सोबतच प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक वीजदर देखील कमी होणार आहे. त्यामुळे या योजनेच्या वेगवान अंमलबजावणीसाठी युद्धपातळीवर कामे पूर्ण करावीत. त्यासाठी महसूल विभागाशी समन्वय ठेवावा, असे निर्देश अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिले.

# मा. ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी घेतला आढावा




▸▸ मा.ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे स्वागत
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले.

**मा.ऊर्जा राज्यमंत्री** मेघना बोर्डीकर यांनी वित्त, वितरण, वाण्ज्यि इ. विभागाच्या एचएसबीसी येथे आयोजित बैठकीत नुकताच सविस्तर आढावा घेतला. महावितरण प्रगतीपथावरील व आगामी योजांनाची माहिती घेतली. वीजग्राहकांना दर्जेदार व तत्पर सेवा द्यावी. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ अधिकाधिक ग्राहकांना मिळवून द्यावा. शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी सुरू असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी सूचना त्यांनी केली. या बैठकीस अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, संचालक (संचालन तथा मानव संसाधन) अरविंद भादिकर, संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे, संचालक (वित्त) अनुदीप दिघे, संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी यांच्यासह कार्यकारी संचालक व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा

## संचालक प्रसाद रेशमे



▸▸ अमरावती परिमंडलातील आढावा बैठकप्रसंगी संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे,
मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी व अधिकारी-कर्मचारी.

**मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०,** प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना, सौर ग्राम योजना शासनांच्या या विविध महत्त्वाकांक्षी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा. तसेच वीजबिलांच्या १०० टक्के वसुलीसाठी मोहीम राबवा, असे स्पष्ट निर्देश संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांनी अमरावती परिमंडलातील आढावा बैठकीत दिले.

या बैठकीस मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी, अधीक्षक अभियंते दीपक देवहाते, दीपाली माडेलवार, सहायक महाव्यवस्थापक (मा.सं.) रूपेश देशमुख, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे, कार्यकारी अभियंता (प्रशासन) प्रदीप पुनसे, अमित शिवलकर, वरिष्ठ व्यवस्थापक विजय पचारे यांच्यासह अमरावती व यवतमाळ मंडलातील कार्यकारी अभियंते उपस्थित होते.

# राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत कोल्हापूर संघाला सर्वसाधारण अजिंक्यपद



▸▸ राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात मान्यवरांच्या हस्ते सर्वसाधारण अजिंक्यपदाचा बहूमान घेताना कोल्हापूर परिमंडलाचा संघ

**राज्यस्तरीय** आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धा २०२४–२५ मध्ये कोल्हापूर परिमंडल संघाने सर्वच क्रीडा प्रकारात दमदार कामगिरी करत सर्वसाधारण अजिंक्यपद पटकावले.

बारामती येथील विद्यानगरीच्या क्रीडा संकुलामध्ये चार दिवशीय राज्यस्तरीय स्पर्धेचा समारोप थाटामाटात झाला. विजेते व उप विजेत्यांना संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. अध्यक्षस्थानी पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रादेशिक संचालक (नागपूर) परेश भागवत, कार्यकारी संचालक (वितरण) दत्तात्रय पडळकर, मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) दत्तात्रय बनसोडे, मुख्य अभियंते राजेंद्र पवार, दिलीप दोडके, पवनकुमार कछोट, स्वप्नील काटकर, धर्मराज पेठकर, मुख्य समन्वयक तथा मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके, मुख्य जनसंपर्क अधिकारी भारत पवार, महाव्यवस्थापक (मासं) राजेंद्र पांडे, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी संचालक (प्रकल्प ) प्रसाद रेशमे म्हणाले की, बारामतीकरांचे आयोजन आणि नियोजन अतिशय चोख होते. त्यामुळे पुढील वर्षाच्या यजमानासाठी हे आव्हान असणार आहे. अतिशय शिस्तबद्ध व तंत्रज्ञानाचा वापर करून ह्या स्पर्धा घेण्यात आल्या. क्रिकेट सामन्यांचे थेट प्रक्षेपण हे पहिल्यांदाच घडले. दिवसेंदिवस आपल्या स्पर्धेचा व खेळाचा दर्जा उंचावत आहे, ही कौतुकाची बाब आहे.

प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे म्हणाले, ‘बारामती येथील स्पर्धा अतिशय चांगल्या वातावरणात पार पडल्या. एक तक्रार सुद्धा नाही हे खिलाडू वृत्ती वाढत असल्याचे द्योतक आहे. खेळाडू प्रणाली गायकी व सचिन कदम यांनी प्रातिनिधीक मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन रोहित राख व मृदुला शिवदे यांनी केले. तर मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी आभार व्यक्त केले.

सांघिक खेळांचे अंतिम निकाल – अनुक्रमे विजेता व उपविजेता : क्रिकेट कोल्हापूर व कल्याण–रत्नागिरी, व्हॉलिबॉल पुणे–बारामती व कोल्हापूर, कबड्डी (पुरुष)– सांघिक कार्यालय–भांडूप व कल्याण–रत्नागिरी, कबड्डी (महिला)– पुणे–बारामती व सांघिक कार्यालय–भांडूप, खो–खो (पुरुष)– पुणे–बारामती व कोल्हापूर, खो–खो (महिला)– सांघिक कार्यालय–भांडूप व पुणे–बारामती, टेबल टेनिस (पुरुष)– छत्रपती संभाजीनगर–नांदेड–लातूर व नागपूर–चंद्रपूर–गोंदिया, टेबल टेनिस (महिला)– अकोला–अमरावती व कल्याण–रत्नागिरी, बॅडमिंटन (पुरुष)– नाशिक–जळगाव व कोल्हापूर, बॅडमिंटन (महिला)– पुणे–बारामती व नागपूर–चंद्रपूर–गोंदिया, कॅरम (पुरुष)– नागपूर–चंद्रपूर–गोंदिया व सांघिक कार्यालय–भांडूप, कॅरम (महिला)– नागपूर–चंद्रपूर–गोंदिया व कोल्हापूर, ब्रिज– नाशिक–जळगाव व अकोला–अमरावती, टेनिक्वाईट महिला– कोल्हापूर व नागपूर–चंद्रपूर–गोंदिया.

वैयक्तिक खेळांचे अंतिम निकाल (कंसात संघ) – अनुक्रमे प्रथम व द्वितीय पुढीलप्रमाणे – १०० मीटर धावणे – पुरुष गट – साईनाथ मसने (सांघिक कार्यालय–भांडूप) व गुलाबसिंग वसावे (पुणे–बारामती), महिला गट श्वेतांबरी अंबादे (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व प्रिया झुनघरे, २०० मीटर धावणे – पुरुष गट – गुलाबसिंग वसावे (पुणे–बारामती) व साईनाथ मसने (सांघिक कार्यालय–भांडूप), महिला गट मेघा जनघरे (कल्याण–रत्नागिरी) व संजना शेजल (पुणे–बारामती), ४०० मीटर धावणे – पुरुष गट गुलाबसिंग वसावे (पुणे–बारामती) व चंद्रशेखर हुमणे, महिला गट – श्वेतांबरी अंबादे (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व संपदा कोकरे (कल्याण–रत्नागिरी), ८०० मीटर धावणे – पुरुष गट परेश चौधरी (नाशिक–जळगाव) व वैभव माने (कोल्हापूर), महिला गट स्वाती दमाणे (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व संजना शेजल (पुणे–बारामती), १५०० मीटर धावणे – पुरुष गट सागर सूर्यवंशी (सांघिक कार्यालय–भांडुप) व आबरार पटेल (नाशिक–जळगाव), महिला गट–रागिनी बेले (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व अर्चना भोंग (पुणे–बारामती), ५००० मीटर धावणे – पुरुष सुनिल कोकणे (कल्याण–रत्नागिरी) व एकनाथ घंगाळे (नाशिक–जळगाव), ४ बाय १०० रिले – पुरुष गट – प्रतीक वाईकर, गुलाबसिंग वसावे, अक्षय केंगाळे, सोमनाथ कांतीकर (पुणे–बारामती) व प्रदीप वंजारे, शुभम निंबाळकर, अथर्व कोळी, वैभव माने (कोल्हापूर) व महिला गट – श्वेतांबरी अंबादे, वेदांशी सोनवणे, स्वाती दमये, संगीता पुंडे (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व सोनिया मिठबावकर, सारिका जाधव, सोनाली मोरे, रिता तायडे (सांघिक कार्यालय–भांडुप)

गोळा फेक – पुरुष गट – प्रवीण बोरावके (पुणे–बारामती) व इम्रान मुजावर (कोल्हापूर), महिला गट प्रियंका शेळके (नाशिक–जळगाव) व पूजा ऐनापुरे (कोल्हापूर), थाळी फेक – पुरुष गट – धर्मेंद्र पाटील (नाशिक–जळगाव) व संदेश मोहिते (सांघिक कार्यालय–भांडुप), महिला गट– ज्योती कांबळे (कोल्हापूर) व प्रियंका शेळके (नाशिक–जळगाव), भाला फेक – पुरुष गट अमित पाटील (कोल्हापूर) व मिलींद डफळे (कल्याण–रत्नागिरी), महिला गट – अश्विनी जाधव (कोल्हापूर) व हर्षदा मोरे (कल्याण–रत्नागिरी), लांब उडी – पुरुष गट अक्षय केंगाळे (पुणे–बारामती) व अमित हुमणे (कल्याण–रत्नागिरी), महिला गट – मेघा जुनघरे (कल्याण–रत्नागिरी) व माया येळवंडे (पुणे–बारामती), उंच उडी – पुरुष गट सतीश पाटील (कोल्हापूर) व जाकीर शेख (छत्रपती संभाजीनगर–नांदेड–लातूर), महिला गट – सोनाली मोरे (सांघिक कार्यालय–भांडूप) व अश्विनी देसाई (कोल्हापूर), बुद्धिबळ– पुरुष गट निलेश बनकर (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व अमोल वराडे (नाशिक–जळगाव), महिला गट – रंजना तिवारी (कल्याण–रत्नागिरी) व अमृता जोशी (सांघिक कार्यालय–भांडुप), कॅरम – पुरुष गट अनिकेत भैसाने (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व अनंत गायत्री (सांघिक कार्यालय–भांडुप), महिला गट – पुष्पलता हेडाऊ (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व विजया माळी (कोल्हापूर), टेनिक्वाईट – महिला एकेरी कविता कांबळे (छत्रपती संभाजीनगर–नांदेड–लातूर) व लिना पाटील (कल्याण–रत्नागिरी), महिला दुहेरी मंजुषा माने, पूजा ऐनापूरे (कोल्हापूर) व शीतल नाईक– कोमल सुरवसे (पुणे–बारामती), टेबल टेनिस – पुरुष एकेरी अतुल दंडवते (पुणे–बारामती) व रितेश सव्वालाखे (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया), पुरुष दुहेरी किरणकुमार पवार रोहन श्रीरामवार (छत्रपती संभाजीनगर–नांदेड–लातूर) व रितेश सव्वालाखे – प्रमोद मेश्राम (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया), महिला एकेरी–स्नेहल बडे (अकोला–अमरावती) व रंजना तिवारी (कल्याण–रत्नागिरी),

(उर्वरित मजकूर पान क्र. ८ वर)

## धावपटू गुलाबसिंग वसावे यांचा सुवर्णवेध



**गुलाबसिंग वसावे** यांनी मंगरूळ (कर्नाटक) येथे आयोजित आंतरराष्ट्रीय साऊथ एशिया मास्टर्स ओपन ॲथलेटिक्स स्पर्धेत देशाला २०० आणि ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत सुवर्णपदक तर ४X४०० रिलेत एक रौप्यपदकाची कमाई करून दिली. या स्पर्धेत श्रीलंका, पाकिस्तान, नेपाळ, भूतान आदी देशातील सुमारे दोन हजार क्रीडापटू सहभागी झाले होते.

ते पुणे परिमंडलात शिवाजीनगर विभागात कार्यरत आहेत. आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील कामगिरीबद्दल वसावे यांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, संचालक (संचालन तथा मानव संसाधन) अरविंद भादिकर, पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी अभिनंदन केले आहे.

## अखिल भारतीय स्पर्धेत अमोल गवळी यांना सुवर्ण



**मध्य प्रदेशातील** जबलपूर येथे नुकत्याच झालेल्या ४६ व्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा स्पर्धा २०२४-२५ मध्ये कुस्ती गटात अमोल गवळी यांनी सुवर्णपदक पटकावले आहे. ते बारामती विभागात तंत्रज्ञ पदावर कार्यरत आहेत. गवळी यांची ९७ किलो वजन गटात हरियाणाच्या मल्लाशी अंतिम लढत झाली. त्यांच्या या यशाबद्दल मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, अधीक्षक अभियंता दीपक लहामगे, कार्यकारी अभियंता संजय सोनवलकर यांनी अभिनंदन केले.

## नेटबॉलमध्ये विरोचन शिंदे याचे यश



**छत्तीसगड** येथे संपन्न १४ वर्षांखालील मुलांच्या राष्ट्रीय शालेय नेटबॉल स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरचा खेळाडू विरोचन शिंदे याने राज्याचे प्रतिनिधीत्व केले. शेंद्रा एमआयडीसी उपकेंद्रातील यंत्रचालक रमेश शिंदे यांचा तो सुपुत्र आहे.

## रोलबॉलमध्ये क्षेत्रा सुरे हिचे यश



**रोलबॉल फेडरेशन** ऑफ इंडिया यांच्या वतीने सातारा येथे आयोजित पाचव्या राष्ट्रीय सब ज्युनियर वेस्ट झोन रोलबॉल चॅम्पियनशिप स्पर्धेत राज्य संघाने रौप्य पदक पटकावले. या विजयात संघातील खेळाडू क्षेत्रा सुरे हिचे मोलाचे योगदान राहिले. कल्याण परिमंडलातील डोंबिवली उपविभागात कार्यरत सहायक अभियंता सतीश सुरे यांची ती कन्या आहे.

## चंद्रकांत तवले यांची सुवर्ण कामगिरी




मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी चंद्रकांत तवले यांचे कौतुक केले.

**कोल्हापूर** येथे झालेल्या ४ थ्या राज्यस्तरीय पॅरा ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत चंद्रकांत तवले यांनी थाळी, गोळा व भाला फेक या तिन्ही क्रीडाप्रकारात सुवर्णपदक पटकावले. गत १२ वर्षांत या तिन्ही क्रीडा प्रकारातील राज्यस्तरीय स्पर्धेत श्री.तवले यांनी १२ सुवर्ण, १० रौप्य तर २ कांस्यपदक कमावले आहे.

ते पुणे परिमंडलात सहायक लेखापाल पदावर कार्यरत आहेत. प्रशिक्षक नंदकिशोर नाळे यांच्या मार्गदर्शनात नियमित सराव व व्यायामाच्या आधारे चंद्रकांत तवले यांनी राज्यस्तरावर ही कामगिरी केली आहे. यासोबतच सिटींग व्हॉलिबॉल क्रीडा प्रकारात बंगळूर (कर्नाटक) येथील स्पर्धेत तवले यांनी राज्याच्या संघाचे प्रतिनिधित्व करून कांस्यपदक पटकावले आहे. तवले यांच्या नेत्रदिपक कामगिरीबद्दल मुख्य अभियंता राजेंद्र पवार, अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड (गणेशखिंड), कार्यकारी अभियंता शेखर मुरकुटे यांनी अभिनंदन केले आहे.

## दर्पण दिनानिमित्त ज्ञानेश्वर आर्दड यांचा विशेष गौरव




जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे हस्ते सन्मानचिन्ह स्वीकारताना जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड. समवेत उपजिल्हाधिकारी देवेंद्र कटके, विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष डॉ.माधव सावरगावे.

**छत्रपती संभाजीनगर** येथे जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने दर्पण दिन साजरा करण्यात आला. या सोहळ्यात जनसंपर्कातील उत्कृष्ट कामगिरीसाठी जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांचा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन विशेष गौरव करण्यात आला. यावेळी विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष डॉ. माधव सावरगावे, उपजिल्हाधिकारी देवेंद्र कटके, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, सहायक संचालक (माहिती) डॉ. मीरा ढास यांची प्रमुख उपस्थिती होती.

# महावितरणसाठी अभिमानाचा क्षण...

## महावितरणचे प्रतीक वाईकर खो-खो विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचे कर्णधार







**महावितरणच्या** पुणे परिमंडलातील पर्वती विभागामध्ये तंत्रज्ञ पदावर कार्यरत प्रतीक वाईकर यांच्या नेतृत्वात भारतीय खो-खो संघाने पहिल्या विश्वचषकाचे विजेते होण्याचा मान पटकावला आहे. तब्बल २० देशांचा सहभाग असलेल्या या विश्वस्पर्धेत भारतीय संघाचा कर्णधार व उत्कृष्ट खेळाडू म्हणून प्रतीक वाईकर यांनी मोलाची कामगिरी केली. विजेत्या संघासह वाईकर यांच्यावर देशभरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

विश्वचषक विजेत्या संघाचे नेतृत्व करणाऱ्या प्रतीक वाईकर यांचे मा. मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, संचालक (संचालन तथा मानव संसाधन) अरविंद भादिकर, पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी अभिनंदन केले आहे.

क्रीडा कोट्यातून १९ जून २०१२ मध्ये प्रतीक वाईकर वयाच्या १९ व्या वर्षी महावितरणमध्ये रुजू झाले. दि. २७ मार्च १९९२ रोजी जन्मलेले प्रतीक यांनी सन २००० च्या सुमारास बास्कटेबॉल, लंगडी व गोल खो-खो खेळायला सुरवात केली. प्रामुख्याने खो-खो खेळातील चपळाई व प्रगती पाहून पुण्याच्या नामांकित नवमहाराष्ट्र क्लबमध्ये प्रतीक यांना प्रवेश मिळाला. तेव्हापासून ते उत्कृष्ट खो-खो पटू म्हणून घडत गेले. संगणकशास्त्रात पदवीधर असलेल्या प्रतीक यांनी वित्त शाखेत एमबीए केलेले आहे. त्यामुळे खेळ व अभ्यास या दोहोंना कायम महत्व दिल्याने कुटुंबियांचे देखील प्रतीक यांना खो-खो खेळण्यासाठी मोठे पाठबळ मिळाले.

महाराष्ट्र शासनाचा श्री शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त असलेले प्रतीक वाईकर यांनी महाराष्ट्र संघाच्या १४ वर्षाखालील, १६ वर्षाखालील व १८ वर्षाखालील वयोगटाचे व वरिष्ठ गटाचे नेतृत्व केले आहे, अशी कामगिरी करणारे ते एकमेव खो-खो पटू आहेत. खो-खो मध्ये मातीकडून मॅटकडे प्रवास सुरु केल्यानंतर दुखापत होण्याचा धोका वाढला तरी कौशल्य, चपळाई व शारीरिक तंदुरूस्तीकडे अधिक लक्ष देत प्रतीक यांनी व्यावसायिक खो-खो स्पर्धेत भाग घेणे सुरू केले. यात खो-खो लिगमध्ये 'तेलगू योद्धांचे' नेतृत्व करीत उपविजेतेपद पटकावले.

खो-खो खेळात 'कॅप्टन कूल' म्हणून ख्याती असलेले प्रतीक हे संघ नेतृत्वामध्ये सांघिक कामगिरीला नेहमीच प्राधान्य देतात, हे विशेष. त्यांच्यासोबतीने पुणे परिमंडलामध्ये खो-खोचे उत्कृष्ट खेळाडू घडत आहेत.

# महिला खो-खो संघाला उपविजेतेपद

**विद्यार्थी क्रीडा केंद्राच्या** वतीने आयोजित ६१ व्या खो-खो स्पर्धेत व्यवसायिक महिला गटात महावितरणच्या संघाने उपविजेतेपद पटकावले. या विजयी संघात भाग्यश्री पवार (कर्णधार- बारामती), सारिका जाधव, श्रेया जाधव (सांघिक कार्यालय), प्रिया पाटील, सोनिया मितबावकर, सोनाली मोरे, अश्विनी शिवले (भांडुप), हेमलता म्हसे, रेखा गावित, ललिता चव्हाण, तनूजा गायकवाड (नाशिक), मानसी सोनवणे (पुणे), वैशाली मानकर, रजनी चने (नागपूर), धनश्री डाके (कोल्हापूर) या खेळाडूंचा सहभाग राहिला. सांघिक कार्यालयातील प्रेरणा रहाटे यांनी या संघाच्या व्यवस्थापक व प्रशिक्षकाची भूमिका पार पाडली. या यशाबद्दल संचालक (संचालन तथा मानव संसाधन) अरविंद भादिकर यांनी अभिनंदन केले आहे.



उपविजेता महिला खो-खो संघ

# महावितरणला सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रीय पुरस्कार



▸▸ आयपीपीएआय पुरस्कार सोहळ्यात पुरस्कार स्वीकारताना मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) दत्तात्रय बनसोडे, अधीक्षक अभियंता (वितरण) अमित बोकील, कार्यकारी अभियंता (विशेष प्रकल्प) शरद बंड, कार्यकारी अभियंता (सामग्री) रमेश देठे, उपकार्यकारी अभियंता आरती कुलकर्णी

**शेतकऱ्यांना** दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या नाविन्यपूर्ण योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल महावितरण आणि एमएसईबी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड कंपनीला बेळगाव येथे आयपीपीएआय पुरस्कार सोहळ्यात राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्याचसोबत सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल विविध वर्गवारीतील एकूण आठ पुरस्कार देऊन महावितरणचा सन्मान करण्यात आला.

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चा गौरव झाल्याबद्दल महावितरणचे आणि अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या नेतृत्वाखालील एमएसईबी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड कंपनीचे अभिनंदन केले. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी मा. मुख्यमंत्र्यांचे आभार मानले असून कंपनीच्या गौरवाबद्दल वीज ग्राहक तसेच सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. इंडिपेंडेन्ट पॉवर प्रोड्युसर्स असोसिएशन ऑफ इंडिया (आयपीपीएआय) या राष्ट्रीय संस्थेने देशभरातील विद्युत कंपन्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करून हे पुरस्कार दिले. मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) दत्तात्रय बनसोडे, अधीक्षक अभियंता (वितरण) अमित बोकील, कार्यकारी अभियंता (विशेष प्रकल्प) शरद बंड, कार्यकारी अभियंता (सामग्री) रमेश देठे, उपकार्यकारी अभियंता आरती कुलकर्णी यांनी कंपनीतर्फे पुरस्कार स्वीकारले.

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत लाखाचा टप्पा ओलांडला



**मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी** यांनी महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी सुरु केलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीत एक लाख घरांचा टप्पा ओलांडला आहे. राज्यात दि. २१ जानेवारीअखेर या योजनेत एकूण १,००,७०० घरांवर सौर ऊर्जा प्रकल्प बसविले गेले. त्यामध्ये ३९२ मेगावॅटची क्षमता निर्माण झाली व ग्राहकांना ७८३ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले. दि. २१ जानेवारी रोजी एका दिवसात ११९५ घरांवर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविले. राज्यात नागपूर जिल्ह्याने सर्वाधिक १६,९४९ घरांवर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसवून प्रथम क्रमांक मिळविला आहे. पुणे (७९३१ घरे), जळगाव (७५१४), छत्रपती संभाजीनगर (७००८), नाशिक (६६२६), अमरावती (५७९५) आणि कोल्हापूर (५०२४ ) हे जिल्हे योजनेचा लाभ घेण्यात आघाडीवर आहेत.

(पान क्र. ५ वरुन )

महिला दुहेरी-स्नेहल बडे-कोमल पुरोहित (अकोला-अमरावती) व प्राची ठाकरे-सायली कांबळे (सांघिक कार्यालय-भांडूप), बॅडमिंटन - पुरुष एकेरी भरत वशिष्ठ (पुणे-बारामती) व पंकज पाठक (छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर), पुरुष दुहेरी - भरत वशिष्ठ-सुरेश जाधव (पुणे-बारामती) व पंकज पाठक- दिपक नाईकवाडे (छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर) व, महिला एकेरी - वैष्णवी गांगारकर (पुणे-बारामती) व राणी पानसरे (सांघिक कार्यालय-भांडुप), महिला दुहेरी वैष्णवी गांगारकर - अनिता कुलकर्णी (पुणे-बारामती) व विदुला पाटील-चैत्रा पै (कोल्हापूर), कुस्ती - ५७ किलो आत्माराम मुंढे (पुणे-बारामती) व संभाजी जाधव (कोल्हापूर), ६१ किलो - विनोद गायकवाड (अकोला-अमरावती) व शरद मोकळे (छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर), ६५ किलो - राजकुमार काळे (पुणे-बारामती) व सूर्यकांत गायकवाड (नाशिक-जळगाव), ७० किलो अनंत नागरगोजे (सांघिक कार्यालय-भांडुप) व युवराज निकम (कोल्हापूर), ७४ किलो -गुरुप्रसाद देसाई (कोल्हापूर) व जयकुमार तेलगावकर (छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर), ७९ किलो अकिल मुजावर (पुणे-बारामती) व ज्योतीबा ओंकार (कोल्हापूर), ८६ किलो महाविर जाधव (पुणे-बारामती) व बलराज आळणे (छत्रपती संभाजीनगर, नांदेड-लातूर), ९२ किलो अमोल गवळी (पुणे-बारामती) व तुषार वारके (कोल्हापूर), ९७ किलो महेश कोळी (पुणे-बारामती) व हनुमंत कदम (कोल्हापूर) आणि १२५ किलो प्रमोद ढेरे (कोल्हापूर) व वैभव पवार (पुणे-बारामती), ब्रिज - पंकज आखाडे - प्रतिक शहा (नागपूर-गोंदिया-चंद्रपूर) व अभिलाष बारापात्रे-विजय पवार (कोल्हापूर), शरीर सौष्ठव - ६५ किलो सुनिल सावंत (कल्याण-रत्नागिरी) विशाल मोहोळ (पुणे-बारामती), ७० किलो अमित पाटील (कोल्हापूर) व मो. जरीन मो. युनूस (अकोला-अमरावती) ७५ किलो प्रवीण झुनके (कोल्हापूर) व नामदेव शिंदे (नाशिक-जळगाव), ८० किलो राहूल कांबळे (कोल्हापूर) व दिनेश दहाडे (नाशिक-जळगाव), ९० किलो अपूर्व शिर्के (कल्याण-रत्नागिरी) व गौरव पोवार (कोल्हापूर) ९० किलो+ - सलमान मुंडे (कोल्हापूर) व नागेश चौगुले (कोल्हापूर), पॉवर लिफ्टींग ५९ किलो रवी मिरगणे (छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर) व दिपक गांगुर्डे (नाशिक जळगाव), ६६ किलो - तेजस आबाळे (अकोला-अमरावती) व राजेंद्र राठोड (छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर), ७४ किलो- मनिष कोंद्रा (पुणे-बारामती) व सागर जगताप (कोल्हापूर), ८३ किलो- स्वप्नील निमसरकार (सांघिक कार्यालय-भांडुप) व प्रवीण घुनके (कोल्हापूर), ९३ किलो- प्रवीण तायडे (अकोला-अमरावती) व महेश इंगोले (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया), १०५ किलो- श्रीकृष्ण इंगोले (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) व नागेश चौगुले (कोल्हापूर).



Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011.
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001. Tel. : 2261 9100
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : भारत पवार • उपसंपादक : किशोर खोबरे
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)